**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १३९ वा | रविवार ०८ ऑक्टोबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 139 | Date : 08/10/2023 | blow :Sunday | Page 4 | Price 4

## महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

मुंबई : देशातून नैर्ऋत्य मान्सूनच्या परतीचा प्रवास २५ सप्टेंबरपासून नैर्ऋत्य राजस्थानातून सुरू झाला. दरम्यान शुक्रवारी महाराष्ट्रातून देखील मान्सूनच्या परतीची वाटचाल सुरू झाली आहे. यासंदर्भातील माहिती भारतीय हवामान विभागाने आज दिलेल्या दुपारच्या बुलेटीनमध्ये दिली आहे. सध्या मध्य प्रदेश, गुजरात या राज्यातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू आहे. दरम्यान आज महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातील काही भागातून नैर्ऋत्य मान्सून परतीचा प्रवास सुरू झाल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरु झाला असून येत्या दोन-तीन दिवसांत राज्याचा दक्षिण मध्य भाग वगळता अन्य भागातूनही मान्सून परतेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र व दक्षिण कोकणातून मान्सून येत्या १० ऑक्टोबरपासून परतण्याची शक्यता आहे.

## कांदे-टोमॅटो रस्त्यावर फेकून प्रश्न सुटणार नाही, सबुरीनं भूमिका घ्या

### अजित पवारांनी शेतकऱ्यांना आवाहन

नाशिक : 'कधी एकदम चांगला भाव मिळतो तर कधी एकदम रस्त्यावर फेकण्याची वेळ येते. मात्र काही वेळा डिमांड आणि सप्लाय या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. पाऊस काळ कसा आहे, यावर भाव अवलंबून असतात. अशा पद्धतीने कांदे टोमॅटो रस्त्यावर फेकून प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांनी सबुरीने भूमिका घेणं आवश्यक आहे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

आज उपमुख्यमंत्री अजित पवार नाशिक दौऱ्यावर असताना कळवण येथे शेतकरी कृतज्ञता मेळाव्यात बोलत होते. अजित पवार पुढे म्हणाले, कांदा निर्यात



शुल्कावरून शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. हे निर्यात शुल्क काढून टाकले पाहिजे, याबाबत सबुरीने भूमिका घेणं आवश्यक आहे, अशी सर्वांची भावना आहे, कारण शेतकऱ्यांना त्यामुळेच दोन पैसे अधिकचे मिळतात. एखाद्या पिकाला चांगला भाव मिळाला की सर्व शेतकरी त्याच पिकाची लागवड करतात. परिणामी पिकाचा पुरवठा वाढला की भाव घसरतात. शेतमाल रस्त्यावर फेकल्याने घसरलेले भाव वाढणार नाहीत, हे जे काही ग्राहक आणि उत्पादक याचा जो ताळमेळ साधला गेला पाहिजे. तसेच सरकार तुमच्यासोबत आहे, शेतक-यांना आम्ही वा- यावर सोडणार नाही असे आश्वासनही अजित पवार यांनी यावेळी दिले.

सध्या टोमॅटोचे भाव कोसळले आहेत, दोन महिन्यांपूर्वी टोमॅटोला सर्वाधिक भाव होता. मध्यंतरी कांद्याचा प्रश्न मोठा बिकट झाला होता. व्यापाऱ्यांनी । **पान २ वर**



## इस्त्रायलच्या प्रतिहल्ल्यात गाझामध्ये मृतांचा खच

### ३०० मृत्यू, हजारो जखमी

जेरूसलेम : गाझा पट्टीतील सत्ताधारी 'हमास' या दहशतवादी गटाने शनिवारी पहाटे इस्त्रायलवर केलेल्या अभूतपूर्व हल्ल्यात १०० जण ठार झाले आहेत. तर इस्त्रायलने प्रत्युत्तरादाखल गाझा पट्टीवर केलेल्या हल्ल्यात १९८ नागरिक ठार झाल्याचा दावा पॅलेस्टिनने केला आहे. 'हमास'ने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्यात साडेसाडशेहून अधिक जखमी झाल्याचे इस्त्रालयी संस्थांनी म्हटले आहे, तर इस्त्रालयच्या गाझावरील हल्ल्यात १,६१० लोक जखमी झाल्याचा दावा पॅलेस्टिनी आरोग्य मंत्र्यांनी केला आहे. हमासच्या हल्ल्यानंतर इस्त्रायलने गाझामध्ये अनेक हवाई हल्ले केले आहेत.

किनारी भागाभोवतीच्या सीमेवर हमास आणि इस्त्रायली सैनिकांमध्ये जोरदार चकमक सुरू आहे. 'हमास' या दहशतवादी गटाने शनिवारी पहाटे इस्त्रायलवर अभूतपूर्व असा हल्ला केला. त्यात सुमारे ४० जणांचा मृत्यू, तर शेकडो नागरिक जखमी झाले आहेत. इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामीन नेतान्याहू यांनी 'हमास'विरोधात युद्धाची घोषणा केली आणि शत्रूला मोठी किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला. त्यानंतर इस्त्रायलने गाझा पट्टीवर अनेक हवाई । **पान २ वर**

### 'हमास'ची मोठी चूक, इस्त्रायलच जिंकेल!'

**'हमास' या दहशतवादी गटाने इस्त्रायलविरुद्ध युद्ध पुकारले आहे. या युद्धात इस्त्रायलच जिंकेल, असा दावा संरक्षण मंत्री योव गॅलंट यांनी केला. तेल अवीव येथील इस्त्रायलच्या लष्करी मुख्यालयात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर संरक्षणमंत्री म्हणाले की 'हमास'ने दक्षिण आणि मध्य इस्त्रायलवर रॉकेट हल्ले करून मोठी चूक केली आहे.**

## सणासुदीच्या दिवसातील गोडी वाढणार! जीएसटी परिषदेच्या बैठकीत मोठे निर्णय

नवी दिल्ली : जीएसटी परिषदेने ऐन सणासुदीच्या दिवसापूर्वीच सामान्यांचे तोंड गोड केले आहे. जीएसटी परिषदेच्या बैठकीत गूळ आणि इतर उत्पादनांवरील करात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गुळावरील जीएसटी दर ५ टक्के करण्यात आला आहे. आतापर्यंत गुळावर २८ टक्के कर आकारला जात होता. त्याचप्रमाणे शिवणकाम आणि भरतकामात वापरल्या जाणाऱ्या जरीच्या धाग्यावरील जीएसटी दर हा १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. जीएसटी कौन्सिलने भरड धान्यावर कर लावण्याचाही विचार केला आणि या संदर्भात निर्णयही घेण्यात आला.





अर्थ मंत्री निर्मली सीतारमन यांनी सांगितले की, कोणत्याही उत्पादनात ७० टक्के भरड धान्याचा समावेश असेल तर त्या उत्पादनांवर कर लावण्यात येणार नाही. मात्र, उत्पादनांत वजनाने भरड धान्यांचा समावेश ७० टक्के असेल आणि कोणत्याही ब्रँडिंग शिवाय असेल तरच या कर सवलतीचा फायदा होणार आहे. ब्रँडेड उत्पादनांवर ५ टक्के दराने कर आकारला जाईल. आतापर्यंत ब्रँडेड आणि प्री-पॅकेज केलेल्या उत्पादनांवर १८ टक्के कर आकारला जात होता. आता, त्यात कपात करण्यात आली आहे.

जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत कर कपातीशिवाय, इतर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, अपीलीय लवादातील सदस्यांचा कार्यकाळ सध्याच्या ६५ वर्षांवरून ६७ वर्षांपर्यंत वाढवण्यास मान्यता दिली आहे. किमान १० वर्षांचा अनुभव असलेल्या वकिलांना अपीलीय न्यायाधिकरणाचे सदस्य बनवले जाऊ शकते.

जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोलबाबत निर्णय घेण्यात आला. । **पान २ वर**

## २० देशांच्या संसदेची परिषद १३ ऑक्टोबरला दिल्लीत

नवी दिल्ली : जगातील २० देशांच्या संसदेचे संमेलन (पी-२०) देशाची राजधानी दिल्लीत आयोजित करण्यात आले आहे. १३ आणि १४ ऑक्टोबर असे दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. भारतात होणारे हे नववे संमेलन आहे.लोकसभेचे अध्यक्ष ओम बिडला यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, जगातील २० देशांच्या संसदेचे एक संमेलन दिल्लीतील द्वारका येथील इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर येथे आयोजित करण्यात आले आहे. जी२० शिखर परिषदेत जे देश सहभागी झाले होते, त्याच देशातील संसदेचे अध्यक्ष पी२० संमेलनात सहभागी होणार आहेत. याशिवाय, १० इतर देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधीसुध्दा या परिषदेत सहभागी होतील.

आंतरराष्ट्रीय पार्लियामेंट युनियनच्या अध्यक्षांसह २६ अध्यक्ष, १० उपाध्यक्ष, १ समिती अध्यक्ष, ५० संसद सदस्य आणि १४ महासचिवांनी या संमेलनात सहभागी होणार असल्याचे लेखी स्वरूपात कळविले आहे. याशिवय पॅन आफ्रिकन संसदेचे अध्यक्ष प्रथमच भारतात होणाऱ्या पी-२० स्पर्धेत सहभागी होणार आहेत, असेही बिडला यांनी यावेळी सांगितले.

## साताऱ्यात शंभूराज देसाईंच्या पत्रकार परिषदांवर बहिष्कार

### पत्रकारांना उध्दट उत्तरे दिल्याने जिल्ह्यातील सर्व पत्रकार संघटनांचा निर्णय

सातारा : राज्य उत्पादनशुल्क मंत्री शंभूराज देसाई यांच्या राज्यभरात होणाऱ्या पत्रकार परिषदांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने घेण्यात आला आहे. पत्रकार परिषदांमध्ये कोणत्याही प्रश्नाची माहिती न घेता पत्रकारांनाच आपला प्रश्न अपुऱ्या माहितीच्या आधारे आहे. असा प्रतिप्रश्न करण्याचा तसेच आपल्या प्रश्नाला उत्तर द्यायला मी बांधिल नाही असे उत्तर देण्याचा प्रकार त्यांच्याकडून सातत्याने होत आहे. त्यामुळे जर पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास ते बांधिल नसतील तर पत्रकार परिषदेला जाण्यासही पत्रकार बांधील नाहीत. त्यामुळे राज्यभरात त्यांच्या पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला असून याला सर्व संघटनांनाचाही पाठिंबा आहे.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, किरण नाईक, परिषदेचे राज्याध्यक्ष शरद पाबळे यांच्या सूचनेनुसार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शरद काटकर,जिल्हाध्यक्ष हरिष पाटणे, सातारा पत्रकार संघ अध्यक्ष विनोद कुलकर्णी, सरचिटणीस दीपक प्रभावळकर, प्रसिध्दी प्रमुख दीपक शिंदे, परिषद प्रतिनिधी सुजित आंबेकर, राज्य महिला सरचिटणीस विद्या म्हासूर्णेकर, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती निमंत्रक राहुल तपासे, समन्वयक शंकर मोहिते, डिजिटल मीडिया राज्य उपाध्यक्ष सनी शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता मर्ढेकर,तुषार भद्रे, मराठी पत्रकार परिषद सलग्न सातारा जिल्हा पत्रकार संघ, सातारा पत्रकार संघ, इलेक्ट्रॉनिक मीडिया संघ, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मीडिया परिषद, ११ तालुक्यांचे पत्रकार संघ यांनी हा निर्णय जाहीर केला.

मंत्री शंभूराज देसाई यांनी पालकमंत्री पद मिळाल्यानंतर पत्रकार परिषदांचा सपाटाच लावला आहे. या पत्रकार परिषदांमध्ये आपल्याला जे आवश्यक आहे तेवढीच माहिती देणे आणि पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे न देण्याची पद्धत त्यांनी स्वीकारली आहे. याबाबत त्यांच्याशी संपर्क । **पान २ वर**

## अफगाणिस्तानातील भूकंपात ३२० ठार

नवी दिल्ली : पश्चिम अफगाणिस्तानला शनिवारी भूकंपाचा तीव्र धक्का बसून किमान ३२० जणांचा मृत्यू झाला असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे. हेरत शहराला संध्याकाळी भूकंपाचे पाच मोठे धक्के बसल्याचे तेथील रहिवाशांना सांगितले, असे वृत्त असोसिएटेड प्रेसने दिले आहे. या भूकंपाचा केंद्रिबदू हेरत शहराच्या वायव्येला ४० किलोमीटरवर होता. अमेरिकेच्या भूगर्भशास्त्र विभागाच्या नोंदीनुसार रिश्टर स्केलवर पश्चिम अफगाणिस्तान ६.३ तीव्रतेचे दोन धक्के बसले. भूकंपानंतर ५.५ तीव्रतेचा धक्का तेथे जाणवला. भूकंपामुळे लोक घराबाहेर पडले. कार्यालये आणि दुकाने रिकामी करण्यात आली असून आणखी हादरे बसण्याचे भय लोकांना वाटत आहे, असे स्थानिकांनी सांगितले.



## राज्यात किमान ५ मोठ्या शासकीय रुग्णालयांत लिव्हर व किडनी प्रत्यारोपणाची सुविधा सुरू करणार : वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर : शासकीय रुग्णालयात मोठमोठ्या शस्त्रक्रियेची सुविधा व प्रत्यारोपण व्यवस्था नाही. गोरगरिबांसाठी राज्यातील २७ पैकी महत्त्वाच्या ५ ठिकाणच्या जिल्हा रुग्णालयात येत्या तीन ते चार महिन्यात लिव्हर व किडनी प्रत्यारोपण सुविधा सुरू करणार असल्याचे राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी अत्याळ, कोल्हापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी सांगितले. नांदेडसारख्या दुर्दैवी घटना राज्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून आरोग्य





यंत्रणा बळकट करण्यासह त्या सुसज्ज करण्याचे कार्य शासनाने हाती घेतले आहे. शासकीय रुग्णालयांवर नेहमीच क्षमतेपेक्षा जास्त ताण असतो. त्यासाठी जिल्हा रुग्णालयाबरोबरच जर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय अधिक बळकट केली तर मुख्यालयात असलेल्या जिल्हा रुग्णालयावरील ताण कमी होईल. यातून गरजूंना चांगल्या प्रकारची आरोग्य सेवा मिळेल असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी उपसंचालक आरोग्य सेवा प्रेमचंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेश गायकवाड, तहसीलदार ऋषिकेश शेळके, गटविकास अधिकारी शरद मगर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सतीश पाटील व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्याळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण होत असल्यामुळे नजीकच्या बेळगुंदी, इंचनाळ,कौलगे, हीरलगे, ऐनापुर, करंबळी व गिजवणे । **पान २ वर**

दैनिक यश सिद्धी न्यूज

संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.9921988358

**सुवर्णसंधी**

लेखक/कवि/साहित्यक/विचावंत यांना सुवर्णसंधी

दैनिक यशसिध्दी न्यूज या वृत्तपत्राच्या दिवाळी विशेषांकामध्ये

आपले लेख/कविता/इतर साहित्य प्रकाशनासाठी संपर्क मो.९९२१९८८३५८ साधावा.

: संपादक :
कमलाकर सोनकांबळे

www.yashsiddhinews.com
Epepar-yashsiddhinews.com

टिप : दिवाळी अंक हा पुस्तक स्वरुपात असेल...

# प्रसिद्ध कवी नवनाथ रणखांबे यांना प्राईड ऑफ भारत हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## पुरस्काराचे विशाल आयोजन देशात प्रथमच

कल्याण : प्रसिद्ध कवी नवनाथ रणखांबे यांना प्राईड ऑफ भारत हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे विशाल आयोजन भारत देशात प्रथमच करण्यात आले आहे उत्तम - उन्नत व उदात्त गुणवत्ता जोपासण्याची लक्षणीय परंपरा असल्याने हे संमेलने अत्यंत अभिनव व अविस्मरणीय ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रधर्मासाठी तत्पर कार्यवीरांना



प्राईड ऑफ भारत या पुरस्कारांनी गौरवण्यात येत असून उद्या पुणे येथे १५ वे अखिल भारतीय कर्तव्यम प्रेरणा महासंमेलन आचार्य अत्रे रंगमंदिर , पिंपरी चिंचवड , पुणे येथे संपन्न होणार असून त्यामध्ये जीवनसंघर्षकार फेम नवनाथ आनंदा रणखांबे यांना मान्यवरांच्या हस्ते प्राईड ऑफ भारत या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

प्रसिद्ध कवी नवनाथ आनंदा रणखांबे यांच्या साहित्यिक , सामाजिक, धार्मिक विविध क्षेत्रात कार्य उल्लेखनीय असून आंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय , राज्यस्तरीय आणि विविध मानाच्या पुरस्काराने नवनाथ रणखांबे सन्मानित आहेत. त्यांचे जीवन संघर्ष आणि प्रेम उठाव ही दोन मराठी भाषेतील पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ती मराठी भाषेचे अभ्यासक , वाचक आणि रसिक यांना प्रचंड आवडली आहेत. नवनाथ रणखांबे विविध बुक ऑफ रेकॉर्ड धारक असून त्यांच्या पुस्तकाने ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय रेकॉर्ड केले आहे . साहित्य विश्वात आघाडीवर असलेला हा तरुण चेहरा शून्यातून विश्वनिर्माण करणारा त्यांचा प्रवास इतरांना प्रेरणादायी आणि प्रोत्साहन देणारा आहे.

# रहिवाशांना संसार उभे करण्यासाठी तातडीने ५० हजाराची मदत : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

मुंबई : आगीत दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोरेगाव उन्नत नगर येथील जय भवानी एसआरए इमारतीतील कुटुंबांना आपले संसार सावरण्यासाठी प्रतिकुटुंब ५० हजार रुपये तातडीने वितरित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. त्याचबरोबर या इमारतीचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांना देतानाच एसआरएच्या इमारतींना संकटकालीन मार्ग म्हणून बाहेरच्या बाजूने लोखंडी जिने बसविण्यासाठी धोरण तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. दुर्घटनाग्रस्त जय भवानी एसआरए इमारतीतील रहिवाशांनी आज खासदार गजानन किर्तीकर यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. यावेळी मुंबई





महापालिका आयुक्त आय. एस चहल, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतिष लोखंडे आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी रहिवाशांसोबत संवाद साधत त्यांना दिलासा दिला. दुर्घटनेतील ज्या जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, त्यांची देयके मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून अदा केली जातील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल आणि फायर ऑडिट करावे. त्यानंतर इमारतीला रंगरंगोटी करावी. इमारतीचा पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरु होण्यासाठी दुरुस्तीच्या कार्यवाहीला वेग देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

या दुर्घटनेतून सावरण्यासाठी आणि आपला संसार पुन्हा उभा करण्यासाठी रहिवाशांना तातडीची मदत देण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी प्रतिकुटुंब ५० हजार रुपये देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. एसआरएच्या इमारती आहेत त्याठिकाणी संकटकालीन मार्ग म्हणून बाहेरून लोखंडी जिने बसविण्यासाठी धोरण तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. रहिवाशांना कपड्यांचे गाठोडी ठेवण्यासाठी स्वतंत्र गोदाम देण्याची व्यवस्था करण्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यापुढे पार्किंगमध्ये मोकळ्या जागेत गाठोडे ठेवू नका असेही त्यांना सांगण्यात आले.

# टाकळीवाडी मध्ये आभा हेल्थ कार्ड साठी आशा स्वयंसेवक यांचे मोलाचे योगदान

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे: टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या संकल्पनेतून डिजिटल इंडिया ची सुरुवात झाली. त्यामध्ये हेल्थ कार्ड मिशनचा एक भाग असून या कार्डाच्या मदतीने देशभरातील सर्व रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी सुविधा होणार आहे.सरकार प्रत्येक व्यक्तीसाठी युनिक हेल्थ कार्ड म्हणजेच आभा कार्ड बनवत आहे. या कार्डामुळे रुग्णाची आरोग्य संबंधी संपूर्ण माहिती नोंदवली



जाईल.हे कार्ड काढण्यासाठी मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे साहेबांनी आवाहन केले आहे. हे कार्ड काढण्यासाठी टाकळीवाडीतील आशा स्वयंसेविका यांनी आपले प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडत आहेत. त्यांना टाकळीवाडीतील नागरिक सुद्धा प्रतिसाद देत आहेत. आशा स्वयंसेविका सौ सुवर्णा कुमार माने; सौ छाया विलास बळे ;सौ लता सागर निर्मळे ;यांनी जास्तीत जास्त नागरिकांनी कार्ड काढण्यासाठी यांची धडपड चालू आहे. यांचे गावांमध्ये कौतुक होत आहे.

# युवकांनी व्यसनापासून अलिप्त राहावे : मारुती बनसोडे

नळदुर्ग/प्रतिनिधीः आज फार मोठ्या प्रमाणात व्यसनामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे.विशेषतः युवा पिढी अनेक व्यसनाना बळी पडत आहेत त्यामुळे पुढे होणारा विनाश टाळण्यासाठी युवकांनी व्यसनापासून अलिप्त रहावे असे आवाहन नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, चे धाराशिव जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि. प. उस्मानाबाद, येडाई व्यसमुक्ती व उपचार केंद्र येरमाळा आणि गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दि.६ ऑक्टोंबर रोजी व्यसमुक्ती सप्ताह निमित्त युवक मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. हरिश्चंद्र गायकवाड होते.

तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदिप तांबारे,डॉ. मोरे परंडा, प्रा. तुषार वाघमारे, इत्यादी उपस्थित होते.




यावेळी सर्व उपस्थित पाहुण्यांनी भाषणे केली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. रणजित वरपे यांनी केले या कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी मिळून जवळपास एकशे दहा विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होतेहा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. अमर गोरे पाटील,प्रा. विशाल जाधव,प्रा. प्रकाश मिसाळ प्रा. कोपणार सर यांनी परिश्रम घेतले

# नळदुर्ग येथे २०० गरजू,गरीब व होतकरु गुणवंत विद्यार्थ्यीनीना सायकलीचे वाटप




वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोट व अणदूर परिसरातील २०० गुणवंत गरजू व आर्थिक द्रष्ट्या गरीब शालेय विद्यार्थ्यीनीना नळदुर्ग येथे सायकलीचे वाटप करण्यात आले.

सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे या उपक्रमा अंतर्गत तुळजापूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय विद्यामान आमदार राणाजगजितसिंह पाटील ऊर्फ राणा दादा यांच्या विशेष प्रयत्नाने तेरणा ट्रस्ट धाराशिवच्या सहयोगाने सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया आणि अँटलास कॉपको इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने नळदुर्ग येथील बि.के.फंक्शन हॉल येथे सायकली वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते ग्रामीण भागातील २ ते ३ कि.मी.पायी चालत जावून शिक्षण घेणाऱ्या गरीब होतकरू गुणवंत २०० विद्यार्थीनीना सायकलीचे वाटत करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थीनीना शिक्षणाची सोय व्हावी त्यांचा वेळ वाया जाऊ नये त्यांना वेळेत शाळेत जात याव त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी या उदात्त हेतू ने सदर सायकलीचे वाटप करण्यात येत आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा तेरणा ट्रस्टचे विश्वास्त प्रथ्वीजीत यांनी या प्रसंगी बोलताना केले. यावेळी सी.एस.आर.हेड अँटलास इंडिया प्रा.लि.चे आभिजीत पाटील,सीएफटीआय सचिव चित्रलेखाताई पाटील, नितीन काळे,माजी जि.प.अध्यक्ष्या अस्मिताताई कांबळे, गणेश कडू,सुमित खैरे, संतोष बोबडे,दिपक दादा अलुरे,गणेश सोनटक्के, उदय जगदाळे, नय्यर जागीरदार,धिमाजी घुगे, दत्ता राजमाने,काशिनाथ शेटे, प्राचार्य डॉ. व्ही.व्ही.माने,प्रा.पटेल सर, सुशांत भुमकर,विलास राठोड,किशोर धुमाळ, अँड. अशिष सोनटक्के,धिमाजी घुगे, अमित देशपांडे, दयानंद मुडके सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नाशिक शिक्षक मतदार संघातील शिक्षक बंधु भगिनींना नाव नोंदणी करा : देशमुख

## मागील नोंदणी रद्द झाली असून पुनश्चः नाव नोंदणी करा

निफाड/प्रतिनिधी : राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी व शिक्षकांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करून प्रश्न सोडविण्यासाठी नाव नोंदणी करा. शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर एस.बी.देशमुख सचिव,प.महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ,पुणे.यांनी नाशिक विभाग शिक्षक मतदार संघातील सर्व शिक्षक बंधु भगिनींन ऑनलाईन नाव नोंदणीचे आवाहन केले आहे..

शिक्षकांच्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी शिक्षक नेता हा धडाडीने प्रश्न सोडविणारा व सामान्य शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी झगडणारा शिक्षकच असावा यासाठी आपण सर्वांनी सक्षम पाठींब्याने आपला शिक्षक नेता निवडून देण्यासाठी मी आपल्याला येत्या शिक्षक निवडणुकीत नाव नोंदणीचे आवाहन करत आहे.मागील नाव नोंदणी ही पुर्णपणे रद्द झालेली असून नव्याने नाव नोंदणी करणे अपरिहार्य आहे याची सर्व मतदार शिक्षक बंधु भगिनींनी नोंद घ्यावी

अर्ज भरण्याकामी आपण मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेचा उपयोग करून आपला स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो व आधार कार्डची झेरॉक्स सोबत जोडून अर्जासोबत एकूण सेवा पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाकडून भरून घेणे व प्रमाणित करावे अर्जातील सर्व माहिती योग्य पद्धतीने परिपूर्ण भरून तालुका तहसीलदार कार्यालयात जमा करावा सर्व शिक्षक बंधु भगिनीं यांनी नाव नोंदणी करावी एस बी देशमुख यांनी आहवान केले आहे

# रविवारी शौर्य जागरण यात्रा निफाड तालुक्यात

निफाड/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराज सर्वांचेच आदर्श आहेत, ज्या प्रमाणे छत्रपतींनी अठरापगड जातींना सोबत घेवून स्वराज्य स्थापन केले व समाजापुढे आदर्श प्रस्थापित केला त्या स्वराज्य स्थापनेला ३५० वर्ष पूर्ण झाली आहेत, विश्व हिंदू परिषदेला ६० वर्षे पुर्ण झाली आहे त्या बद्दल बजरंग दलाच्या माध्यमातून निफाड तालुक्यात रविवारी शौर्य जागरण यात्रेचे आयोजन केले आहे. अशी माहिती बजरंग दलाचे जिल्हा संयोजक समाधान कापसे यांनी दिली आहे.रविवार सिन्नर वरुन सकाळी ७ वाजता सायखेडा येथे येईल त्यानंतर , सायखेडा- चितेगाव फाटा - चांदोरी- पिपळस रामाचे- निफाड - शिवडी- ऊगाव- शिवडी- निफाड- शिवरे फाटा- नांदुर म.-शिवरे फाटा- नैताळे- धारणगाव - रुई- देवगाव - शिरवाडे- भरवस- गुंजळवाडी - विंचुर- लासलगाव पुढे मनमाड जाईल सर्व बजरंगी व हिंदू धर्म रक्षक यांना विनंती आहे की ही शौर्य जागरण यात्रा यशस्वी करण्यासाठी आपल्या सर्वांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे आपण आपल्या भागात, चौकात, नगरात त्याबद्दल जन जागृती असे अहवाहन .समाधान एल.कापसेबजरंग दल जिल्हा नाशिक ग्रामीण यांनी केले आहे

# दुहेरी जलवाहिनीच्या कामाला गती : आयुक्त

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी धरणातून आणण्यात येणाऱ्या १७० एमएलडी क्षमतेच्या जलवाहिनीच्या कामाची महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी शुक्रवारी पाहणी केली. काम पूर्ण झाल्यानंतर या योजनेद्वारे सोलापूर शहरास दररोज १७० एमएलडी (दशलक्ष लीटर) पाणी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती आयुक्तांनी दिली. आतापर्यंत एकूण ११० किलोमीटरपैकी ४६.२० किलोमीटर पाइप्सचा पुरवठा करण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे, मक्तेदार पोचमपाड कंपनीचे रंगा राव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे एम. एस. हरीश, विजयकुमार नलावडे, अरुण पाटील, देविदास मादगुंडे आदी उपस्थित होते. हे काम १ जून २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. या योजनेसाठी स्मार्ट सिटी हिस्सा २५० कोटी रुपये, एनटीपीसी हिस्सा २५० कोटी रुपये, महाराष्ट्र शासन (नगरोत्थान)- ३८२.६८ कोटी रुपये दिले आहेत. महत्त्वपूर्ण अशा दुहेरी जलवाहिनी प्रकल्प योजनेत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जॅकवेल बांधणे (४५ मी. बाय ३३ मी. बाय १८.५० मी.), पंपींग मशीनरी (११५० एच.पी. ६ नग), अशुद्ध पाण्याची दाब-नलिका (१५२४ मिमी व्यास १४ मिमी जाड एम.एस. पाईप लांबी २८.५० कि.मी.), बी.पी.टी. (क्षमता ६.५० लक्ष लीटर्स), अशुद्ध पाण्याची उतार नलिका (१४७३/१४२२/ ११६८ मिमी व्यास १२ मिमी जाड एम. एस. पाइप लांबी - ८१.५० कि.मी.) असे एकूण ११० कि.मी. पाइपलाइन, क्रासिंग्स (रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, इतर रस्ते, कॅनॉल, सीना नदी असे एकूण ६३ नग) आदी कामांचा समावेश आहे.जॅकवेलची १८.५० मीटर खोलीची खोदाई तसेच पीसीसीचे काम पूर्ण झाले आहे. राफ्ट फाउंडेशनसाठी स्टील बाइंडिंगचे काम प्रगतिपथावर आहे. आजपर्यंत ११० कि.मी. पैकी ४६.२० कि.मी. पाइप्सचा पुरवठा करण्यात आला आहे. आजपर्यंत ११० कि.मी. पैकी ३५.७० कि.मी. पाइप अंथरले आहेत. आजपर्यंत एकूण १६ कि.मी. पाइपलाइनचे हायड्रॉलिक टेस्टिंग पूर्ण झाले आहे. क्रासिंग्स कामांतर्गत राष्ट्रीय महामार्ग-४, राज्य महामार्ग १, इतर रस्ते- २, कॅनॉल- ५ पूर्ण झाले आहे,अशी माहिती आयुक्तांनी दिली. उजनी ते सोरेगावपर्यंत ही जलवाहिनी टाकण्याची महत्त्वपूर्ण योजना आहे. सुरू असलेल्या कामाची हायड्रॉलिक टेस्टिंग व गुणवत्तेची तपासणी केली. या कामासाठी पाइप पुरवठा सुरू आहे. वर्क ऑर्डरमधील कराराप्रमाणे नोव्हेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण करण्यात येणार असले तरीही त्यापूर्वीच हे काम पूर्ण करण्याचा शर्तीचा प्रयत्न राहणार आहे. यामुळे सोलापूरकरांना १७० एमएलडी पाणी रोज उपलब्ध होणार आहे, त्यांनी स्पष्ट केले.

# ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी ओबीसी संघर्ष समितीचा भिवंडी तहसील कार्यालयावर विशाल मोर्चा

भिवंडी/मिलिंद जाधव : मराठा समाजाचे ओबीसीकरण नको, बिहारच्या धर्तीवर ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यात यावी, गेल्या वर्षी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजासाठी ७२ वसतिगृहे सुरू करण्याचे जाहीर केले होते ती सुरू करण्यात यावी अशा विविध प्रमूख मागण्यासाठी भिवंडी येथे ओबीसी संघर्ष समिती मार्फत तहसील कार्यालयावर विशाल मोर्चा काढण्यात आला होता.




ओबीसी संघर्ष समिती मार्फत स्व. आनंद दिघे चौक ते तहसील कार्यालय पर्यंत शांतता पुर्ण निदर्शने करून तहसील दारांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले, मोर्चात ओबीसी प्रवर्गातील विविध समाजातील शेकडो समाज बांधव समाविष्ट झाले होते, ओबीसी मध्ये कोणत्याही प्रकारची घुसखोरी होऊ देणार नाही,

नाहीतर हे आंदोलन अधिक तीव्रतेने केले जाईल असा इशाराही सरकारला देण्यात आला. या आंदोलनासाठी गेले अनेक दिवस ओबीसी संघर्ष समिती सरचिटणीस प्रमोद जाधव, ॲड. अनिल पाटील, राजेंद्र पाटील, अजय किरपण, भगवान सांबरे, पंडीत पाटील, कल्पेश केने, रवींद्र जाधव,श्याम पाटील यांनी पुढाकार घेतला होता, तर आंदोलन साठी दत्ता पाटील, कुणबी सेना प्रमुख विश्वनाथ पाटील, माजी आमदार रुपेश म्हात्रे, विश्वास थले, तानाजी मोरे, श्रीकांत गायकर, प्रकाश भोईर, डॉ. नूतन मोकाशी आदी विवीध क्षेत्रांतील समाज बांधव उपस्थित होते.

# शेतकरी, विद्यार्थी तसेच व्यापारी वर्गांच्या हितासाठी केंद्रशासनाचे सकारात्मक निर्णय : शिक्षण मंत्री, दीपक केसरक

नवी दिल्ली : शेतकरी, विद्यार्थी, व्यापार व उद्योग क्षेत्रातील लोकांना ५२व्या जीएसटी परिषदेत करातून काही दिलासा मिळाला असून केंद्रशासनाने यावर्गांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घेतल्याबाबत शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज समाधान व्यक्त केले.वित्त मंत्रालयाच्यावतीने वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५२ वी बैठक येथील सुषमा स्वराज भवनात आयोजित करण्यात आली. या बैठकीची अध्यक्षता अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. बैठकीत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर या परिषदेस राज्याच्यावतीने उपस्थित होते. यासह राज्याच्या वित्त सचिव शैला ए. आणि जीएसटी आयुक्त राजीव कुमार मित्तल उपस्थित होते.

बैठकीनंतर श्री केसरकर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. वस्तु व सेवाकर परिषदेच्या महत्वाच्या बैठकीत राज्यात वस्तु व सेवाकराशी निगडित महत्तवाच्या मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.प्रामुख्याने ज्या प्रकरणांमध्ये स्वीकार्य कालावधीत अपील दाखल करता आले नाही, अशा प्रकरणांमध्ये मागणी आदेशांविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी वन टाइम ऍम्नेस्टी योजना सुरू केली गेली असल्याचे श्री केसरकर यांनी सांगितले. याबाबत, कौन्सिलने उत्रब्ढ कायदा, २०१७ च्या कलम १४८ अन्वये एका विशेष प्रक्रियेद्वारे माफी योजना उपलब्ध करून देण्याची शिफारस केली आहे. यामुळे व्यापार सुलभ करण्यासाठी मदत होणार असल्याचे श्री केसरकर यांनी सांगितले. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत अशा आदेशांविरुद्ध करदात्यांनी अपील दाखल करण्याची परवानगीला केंद्राने मान्यता दिली असल्याचे सांगत, विवादाधीन कराच्या १२.५% प्री-डिपॉझिटची रक्कम भरण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रकरणे सादर करता येतील. महाराष्ट्र राज्याता जवळपास १४००० प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती दिली व हा निर्णय राज्यासाठी महत्तवाचा असल्याचे सांगत राज्याला यानिर्णयामुळे दिलासा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

वर्ष २०२३ हा भरडधान्य वर्ष घोषित केले गेले आहे. याबैठकीत, जीएसटी परिषदेने भरडधान्यावर १८ टक्क्यांवरून ५ टक्के एवढा कर लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा महत्तवाचा निर्णय घेतला असल्याची माहिती श्री केसरकर यांनी दिली. पुढे ते म्हणाले की, जर एखाद्या उत्पादनाच्या रचनेत ७० टक्के भरडधान्य वापरले गेले असेल व ब्रांडिग शिवाय विकले गेले तर यावर कुठलाही कर आकारला जाणार नाही, तथापि जर भरडधान्याचा पिठास ब्रांडिंग व पॅकेजिंग झाल्यास यावर ५ टक्के कर आकरण्यात येईल अशी माहिती दिली.



जीएसटी कौन्सिलने मोलॅसिसवरील जीएसटी दर २८ टक्क्यांवरून ५ टक्के कमी करण्यास मान्यता दिली आहे. ह्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकर्यांना याचा लाभ मिळेल तसेच ऊस उत्पादक शेतक-यांना त्यांची थकबाकी लवकर भरली जातील व यामुळे अधिक पैसे गिरण्यांच्या हातात राहतील. यामुळे पशुखाद्य निर्मितीचा खर्चही कमी होईल कारण मोलॅसिस हा देखील त्याच्या निर्मितीचा एक घटक आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने दिले जाणारे प्लॉट्सवर सुरूवातीला जीएसटी आकारला जायचा नाही. तथापि, त्याच प्लॉटच्या मालकाने (उद्योगपती) दुस-या उद्योगपतीस त्याची जागा विकली तर त्यावर जीएसटी कर आकारले जायचे. मात्र आता कुठल्याही प्रकारचा जीएसटी कर आकारला जाणार नसल्याचा महत्तवाचा निर्णय या बैठकीत घेतला गेल्याची माहिती देत, त्यांच्या या विनंतीला जीएसटी परिषदेने मान्य केल्याचे त्यांनी सांगितले.

अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात येऊन होस्टेल मध्ये वास्त्व्यास येतात. तथापि, हॉस्टेलच्या प्रतिदिन खोलीभाडे रूपये १०००/- वर ही जीएसटी लागू असायचा. जीएसटी परिषदेने जून २०२२ मध्ये घेतलेल्या बैठकीत जीएसटी संबंधित विविध कर -सवलती मागे घेतल्या होत्या. त्यात हॉटेलच्या रूपये १०००/- पर्यंतच्या खोल्यांवर कर-सवलत मागे घेण्यात आली होती. यामध्ये आता हॉस्टेल त्याच श्रेणीत आणल्यामुळे १०००/- रूपये पर्यंतच्या खोलीभाड्यावर कुठलेही कर आकारण्यात येणार नसल्याची माहिती त्यांनी दिली.

**खारी आणि टोस्टवर १२ टक्क्यांवरून ५ टक्के जीएसटी**

महाराष्ट्र, गुजरात तसेच गोवा या राज्यांमध्ये साधी खारी चहा सोबत खाण्याची दैनंदिन जीवनाचा भाग आहे. यामध्ये १२ टक्के जीएसटी कर आकारला जात होता. तथापि, या साध्या खारीला (पफ) ब्रेडच्या श्रेणीत समाविष्ट करण्याची विनंती श्री केसरकर यांनी बैठकीत केली व त्यास परिषदेने मान्यता दिल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले.

न्यायाधिकरण सुधारणा कायदा २०२१ नुसार, अप्रत्यक्ष कर कायद्याच्या सरावात किमान १० वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्ती आता ट्रायब्युनल सदस्य पदासाठी अर्ज करण्यास पात्र असतील. याशिवाय अध्यक्षांची वयोमर्यादा ७० वर्षांपर्यंत वाढवण्यात आली असून, सदस्यांची वयोमर्यादा ६५ वरून ६७ पर्यंत वाढवण्यास परिषदेने मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले. अपील ऑनलाईन गेमिंग जीएसटी ऑनलाइन गेमिंग वर २८ वरून १८ टक्के कर आकारण्याबाबत काही राज्यांची जीएसटी परिषदेस मागणी होती. याबाबत श्री केसरकर यांनी हा कर २८ टक्के असावा यावर भर दिला. तसेच, ज्या ऑनलाइन गेमिंग कंपन्यांना करचुकवेगिरीच्या नोटिसा जारी केल्या आहेत, अशा कंपन्यांना पूर्वलक्षीप्रभावापासून २८ टक्के कर आकारण्यात येऊ नये, ज्यास परिषदेने मान्य केले. ऑनलाइन गेमिंग कॅसिनो, हॉर्स रेसिंगवरील करात स्पष्टता आणण्यासाठी वस्तू आणि सेवा कर (ऋडढ) कायद्यातील सुधारणांना मंजूरी देण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. जीएसटी परिषदेने पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन आणि झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आणि सरकारी प्राधिकरणांना पुरवल्या जाणार्या अपग्रेडेशन यांसारख्या सेवांना जीएसटी करातून सूट दिली आहे.



## कळंब आगारातील एसटी कामगारांनी सहभाग नोंदवत गट स्तरावर तिसरा क्रमांक पटकावला

कळंब/प्रतिनिधी : सलग तीन वर्ष कामगार कल्याण मंडळ आयोजित कामगार भजन स्पर्धा धाराशिव येथे संपन्न झाली. त्यात या वर्षीही कळंब आगारातील एसटी कामगारांनी सहभाग नोंदवत गट स्तरावर तिसरा क्रमांक पटकावला. याच्यात अजय कदम, बळीराम कवडे महाराज, सुबोध रणदिवे, विजयकुमार मैंदाड, गणेश भराटे ,विलास थोरात, संतोष पुरी, जाधव, स्वप्निल काटमांडे, इत्यादींनी सहभाग नोंदवला...

## अक्कलकोट तालुक्यात महादेव जानकर यांचा जय दुर्गादेवी संस्थेच्या वतीने झाला सत्कार



अक्कलकोट/प्रतिनीधी: अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था या संस्थेकडून माजी कॅबिनेट मंत्री राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र कोळी यांच्या हस्ते कोळी टोपी घालून सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सदस्य संगप्पा कोळी. राष्ट्रीय समाज पक्ष महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुनील दादा बंडगर. राष्ट्रीय समाज पक्ष तालुका युवा नेते संतोष शिंदे. कोळी महासंघ उपाध्यक्ष राज कोळी. शिवानंद कोळी. यावेळी जानकर साहेबांना कोळी समाजाकडून भव्य सत्कार करण्यात आले. कोळी समाजाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंदकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचा २९ वा दिक्षांत समारंभ

### विद्यार्थ्यांनी बदलते तंत्रज्ञान आत्मसात करून नवीन आव्हानांना सामोरे जावे : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान

पुणे : विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाचा विचार करून नवीन आव्हानांना सामोरे जाणे आवश्यक आहे. येत्या २५ वर्षात भारत जगातील सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने पाऊल टाकत असताना या कार्यात युवा पिढीने योगदान द्यावे, असे आवाहन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केले. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या २९ व्या दिक्षांत समारंभ प्रसंगी श्री. प्रधान बोलत होते. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे विश्वस्त रमाकांत लेंका, सचिव मिलिंद देशमुख उपस्थित होते. पदवीधर विद्यार्थांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देवून केंद्रीय मंत्री श्री. प्रधान म्हणाले, जगभरात आज तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग यासारख्या तंत्रज्ञानात वाढ होत आहे. कृत्रिम बुद्धिमतेमुळे डेटा संगणन करणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांनी या नव्या प्रवाहांची माहिती घेऊन आपले मार्ग निवडावे.

पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करावे. देशात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. विद्यार्थ्यांनी नोकरी शोधणारा न होता नोकरी देणारा म्हणून पुढे आले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

गोखले इन्स्टिट्यूट ही एक उत्तम संस्था आहे. देशात आर्थिक विषयाचे आरेखन करण्यामागे गोखले संस्थेचे मोठे योगदान आहे. या संस्थेत अर्थशास्त्र विषयाच्या संशोधनाबरोबरच विद्यार्थांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत असल्याबाबत त्यांनी संस्थेचे कौतुक केले.




शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी गोखले संस्थेचे अभ्यासपूर्ण संशोधनाद्वारे मोठे योगदान - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील राज्यातील मराठा आरक्षण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी गोखले संस्थेने अभ्यासपूर्ण संशोधन करून मोठे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी केले.

पाटील म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात अहिंसा आणि वैधानिक मार्गाने गोपाळ कृष्ण गोखले यांनी योगदान दिले.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या प्रेरणेतून १९३० साली सुरू झालेल्या या संस्थेत आरोग्य, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कृषी, सामाजिक विज्ञान यासारख्या विषयावर संशोधन होत आहे. आपला देश जगात ५ वी आर्थिक महासत्ता बनला आहे. २०४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळून १०० वर्ष होतील. त्यावेळी आपण जगात पहिल्या ३ क्रमांकावर असू. विद्यार्थ्यांनी आपली सारी बुद्धिमत्ता स्वतःच्या आणि देशाच्या प्रगतीसाठी खर्च करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात श्री. रानडे यांनी गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कार्याची माहिती दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. 'मेकिंग ऑफ अन इकॉनॉमिक सिटाडेल' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच उपस्थितांना शांततेची शपथ देण्यात आली.

## महिलांनी व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा : मारुती बनसोडे

नळदुर्ग/प्रतिनिधी: समाजात दिवसे दिवस आज व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असून यामुळे युवा पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे. समाजातील ही अवस्था बदलायची असेल तर आता गावातील महिलांनी व्यसनमुक्त गाव करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे मत नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी व्यक्त केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र राज्य, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि. प. धाराशिव, परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.७ ऑक्टोंबर

रोजी निलेगाव ता. तुळजापूर येथे व्यसनमुक्ती सप्ताहानिमित्त महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी मारुती बनसोडे यांनी मार्गदर्शन करताना आता व्यसमुक्तीसाठी काम करणे काळाची गरज आहे असे ही म्हणाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महिला प्रभाग संघाच्या अध्यक्षा निर्मलाताई मोरे होत्या यावेळी गावातील बचत गटाच्या अध्यक्षा व



सचिव आणि अन्य महिला मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या

दिनाक २ ते ८ऑक्टोबर या कालावधीत व्यसमुक्ती सप्ताह निमित्त हा मेळावा घेण्यात आला तर नशा बंदी मंडळ महाराष्ट्र या संस्थेला ६५ वर्ष पूर्ण होत असून हितचिंतक सभासद मोहीम ही राबविण्यात येत आहे असे मारुती बनसोडे यांनी सांगितले आहे



श्री.बाळासाहेब गणपती मोरे
मो.९९२२३२३०३७, ९३२४६१८२३४



मुल होत नसेल तर मुल होण्यासाठी आयुर्वेदिक औषध

ज्यांना मुल होत नसेल त्यांनी पाळीच्या अगोदर दोन दिवस औषध घेऊन जाणे.
एक मुल होऊन पुन्हा मुल होत नसेल त्यांनीही औषध घेऊन जावे.

गावाच्या पूर्व बाजूच्या मळ्यात, मु.पो.टाकळीवाडी ता.शिरोळ जि.कोल्हापूर